ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.958

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

January - 2025
Vol. 14
Special Issue
No. 1

# भारतीय रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय

**डॉ. के. डी. जाधव[1], विशाल सुनील जगताप[2]**

*[1]मार्गदर्शक प्राध्यापक*

*[2]संशोधक*

*संगमनेर नगरपालिका कला, दा .ज. मालपाणी वाणिज्य व ब. ना. सारडा विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) संगमनेर*

*Corresponding Author: डॉ. के. डी. जाधव*

**DOI - 10.5281/zenodo.14885679**

**प्रस्तावना:**

भारत या देशांमध्ये जगातील आधुनिक मानवाने स्थापन केलेली मानवी संस्कृती पुरातत्त्व संशोधकांना आढळून येताना आपणास दिसून येते. तिला आपण सिंधू नदीची सभ्यता या नावाने ओळखतो. हडप्पा व मोहनजोदारो संस्कृती किंवा जोर्वे संस्कृती या नावाने ओळखतो. या संस्कृतीच्या पाऊलखुणा आज 2025 मध्ये देखील आपल्याला आढळून येतात. भारतात राजेशाही राज्यकारभाराची व्यवस्था हा भारत देश प्रजासत्ताक होईपर्यंत अस्तित्वात होती.

सध्याच्या भारत देशामध्ये आपण जेव्हा सप्तसिंधूचा प्रदेश म्हणतो त्यावेळी या देशांमध्ये नाणेघाटा सारख्या जकात घेण्याच्या पद्धती सध्याच्या पुणे जिल्ह्यामध्ये अस्तित्वात होत्या. मौर्य साम्राज्यात रुपया या नावाने प्रचलित असलेले 2500 वर्षांपूर्वीचे चलन या सर्वांचा **भारताच्या रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय** या शोध निबंधामध्ये आढावा घेणे प्रासंगिक असलेले मला दिसून येते. महाराष्ट्रामध्ये शिवराई नावाने नाणे पाडून महाराष्ट्रीयन मुलखाला सार्वभौम करणारे अलीकडच्या पाचशे वर्षाच्या इतिहासात शिवाजी राजे हे एकमेव राजे आपल्याला दिसून येतात. त्यामुळे चलन किती महत्त्वाचे आहे हे आपल्याला समजते. छत्रपती शिवाजी महाराजांनी इसवी सन 1674 केलेल्या राजापूर व्यापारतहा मध्ये महाराज लिहितात “कोणतेही नाणे आमच्या राज्यात चालवण्याविषयी आमच्याकडून मुळीच प्रतिबंध होत नसतो व जे नाणे घेतल्याने आमच्या प्रजेचे नुकसान होण्याचा संभव असतो ते घेण्यास विषयी आमच्याकडून जुलूम होणे रास्त नाही. तुमचे नाणे मोघलांच्या नाण्याइतके जड व चांगले असल्यास ते चालल्यास आमच्याकडून काही एक हरकत नाही. तो प्रजेचा खुशीचा सौदा आहे.” या उत्तरांमध्ये तुमचे नाणे मोघलांच्या नाण्याइतके जड व चांगले असल्यास याचा अर्थ इंग्रजांची नाणी ही मुघलांच्या व शिवराई या नाण्यापेक्षा हलकी होते असा त्याचा अर्थ होतो त्यामुळे मानवाच्या आर्थिक व्यवहारत नाणी व नोटांची सत्यता (व्हॅलिडीटी) किती महत्त्वाची आहे हे आपणास समजते.

19 वे शतक हे लंडन, 20वे शतक हे न्यूयॉर्क व 21वे शतक हे मुंबईचे आहे असे म्हणतात. जगामध्ये सध्या 25 श्रीमंत उद्योग समूह डेटा किंवा सेवा क्षेत्रामध्ये काम करणारे आहे. आपण भारताच्या संदर्भात माहिती तंत्रज्ञानाच्या टिसीएस ,विप्रो या कंपन्यांचा महसूल नफा हा जवळपास 100 पैकी 90 रुपये हे परकीय चलनात येतात. त्यामुळे आपणास कळवू शकेल मानवाचे आर्थिक व्यवहार हे किती गुंतागुंतीचे आहे ते समजते.

विश्वामधील सर्वात प्रथम सर्वात जास्त श्रीमंत झालेली व्यक्ती म्हणजे जॉन डी रॉकफेलर हा अमेरिकन उद्योजक साधारण शंभर वर्षांपूर्वी श्रीमंत झालेला दिसून येतो. या व्यक्तीचा त्या काळामध्ये

खनिज तेलाचा व्यवसाय होता. आज तिचा अमेरिका संयुक्त राष्ट्रांमध्ये वैश्विक पर्यावरण बदलत आपले विचार मांडत आहे.

विसावे शतके प्रचंड रक्त पाताचे वैश्विक अशांततेचे 2500 वर्षातील सर्वाधिक रक्तपाताचे होते. या काळात प्रत्येक राष्ट्र हे आपली सीमा ठरवत होते परंतु भारत हा असा देश आहे ज्याने स्वतःहून एक स्वतंत्र पाकिस्तान सारखे राष्ट्र तयार करून दिले. भारताला इंग्रज राजवटी पासून स्वातंत्र्य मिळवल्यानंतर देखील भारताचे चलन हे पाकिस्तान मध्ये काही काळ साठी ग्राह्य धरले जात होते. प्रत्येक राष्ट्राला आपल्या स्वतःच्या चलनाची बाजारात खूप मागणी टिकून राहावी असे वाटत असते तरीपण सर्वच राष्ट्रांच्या बाबतीत असे होत नाही. त्यामुळे चलन बाजारात मागणी आणि पुरवठा चलनाची ती तेजी मंदी यासारखे आर्थिक समस्या होतात. भारतासारखा 2047 मध्ये विकसित राष्ट्र उद्देश ठेवलेल्या राष्ट्राला आपल्या रुपया चलनाची देखील खूप चांगल्या पद्धतीने काळजी घ्यावी लागणार आहेत. त्यातून 2047 जर योगायोगाने आपण जर विकसित राष्ट्र म्हणून जर नावारूपास आलो तर रुपया हा आंतरराष्ट्रीय पातळीवर खूप महत्त्वाची भूमिका बजावताना आपल्याला दिसून येईल. यासंदर्भामध्ये रुपयाची सद्यस्थिती घसरण व उपाय या विषयांमध्ये संशोधन करण्यास खूप चांगली संधी मला दिसून येत आहे.

**शोध विषयाचे महत्त्व:**

काही धर्मामध्ये सांगून ठेवले आहे की संग्रह करावयाचा नाही त्यास अपरिग्रह असे नाव दिलेले आहे. पैसे साठवणे हे पाप आहे पण दुसरीकडे आपण कधीकधी वाचन करताना आपणास समजते की गुप्तधनासाठी देखील नर बळी दिला जात असल्याचे आपण वाचतो किंवा आपल्याला वार्ता कानावर पडते त्यामुळे आपल्याला पैसे किती महत्त्वाचे आहे ते समजते. प्रत्येक व्यक्तीसाठी पैसे हे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर प्रत्येक कुटुंबासाठी व स्थूल मानाने राष्ट्रासाठी (मध्यवर्ती बँक) हे खूप महत्त्वाचे पैसे असतात.

भारत हा जगातील सर्वात जास्त युवा लोकसंख्या असलेले राष्ट्र आहेत. त्याचबरोबर भारतीय रिझर्व बँक या नावाने भक्कम मध्यवर्ती बँक आहे. इंग्लंड, अमेरिका, युरोप, या तीन वेगवेगळ्या प्रांतांमध्ये जे काही वेगवेगळे हवामान आढळते त्यातील सर्वच प्रकारचे हवामान हे भारतात आढळते. 1776 साली ॲडम स्मिथ यांनी राष्ट्राची संपत्ती यामध्ये लिहून ठेवलेल्या ग्रंथांमध्ये ते लिहितात "युरोपात बारा महिन्यातून हवामानामुळे मका बारली किंवा ओट सारखे पिक एकदाच घेता येते. त्यामुळे आमचे शेतकरी एका दाण्याचे हजार दाणे एकदाच करतात परंतु भारतीय उपखंडामध्ये 12 महिन्यात तीन पिके काढायची क्षमता आहे. त्यातून त्यांची तीन दाण्याचे 3000 दाणे काढण्याची क्षमता आहे." एकूणच भारतीय समाज शेतीशी जोडलेला आपणास दिसून येतो.

भारतीय सण जसे की मकर संक्रांति, गुढीपाडवा, वटपौर्णिमा, कोजागिरी पौर्णिमा, दीपावली हे सण उत्सव देखील आपण भारतीय लोक निसर्गाशी खूप चांगल्या प्रकारे एकरूप होऊन साजरे करीत असताना आपणास दिसून येते. त्यामुळे भारत सरकारच्या काही धोरणाप्रमाणे विकसित भारत 2047 हा अजेंडा पूर्ण करण्यासाठी. भारत सरकारने पाणी, घर, विज, रस्ते यासारख्या पायाभूत सुविधा गावांमध्ये तयार करण्याचे धोरण ठेवलेले आपणास दिसून येते. भगवान श्रीकृष्णाच्या साथीदारांनी ज्या प्रकारे गोवर्धन पर्वत उचलून धरून ठेवला व सगळ्या गोकुळाला आपल्या छायेत घेतले परंतु आपण असे देखील म्हणू शकतो की यामध्ये दंतकथा ही भगवान श्रीकृष्णाची तयार झाली. सामान्य लोक हे फक्त संकटातून वाचले. सध्या जगात देखील चार-पाच देशांच्या अर्थव्यवस्था

भक्कम आहे भारताचा विचार आपण सविस्तर करणारच आहोत.

ग्रेट ब्रिटन, जपान, अमेरिकेची संयुक्त संस्थांन, युरोप हे चार प्रांत इतरांच्या प्रभावाखाली निर्णय न घेता स्वतःच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेताना आपणास दिसून येताना दिसतात. वास्तविकपणे या चार प्रांतांमध्ये जगाच्या एकूण दहा टक्के पेक्षा कमी लोकसंख्या वास्तवास आहे. भारतीय रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय यामध्ये मी विशेष भर हा अमेरिकेत डॉलरची तुलना त्याचबरोबर भारतीय रुपयाची सद्यस्थिती यामध्ये तुलना करणार आहे. जानेवारी 2025 हा महिना भारतासाठी खूप महत्त्वाचा ठरलेला आहे. कारण आपण जेव्हा सांगतो की 21 व्या शतकातील भारताच्या इतिहासातील 24 वर्ष संपलेली आहे. 2047 मध्ये आपण विकसित भारताचे ध्येय घेऊन वाटचाल करीत असताना आपल्याला असे दिसून येते की सध्या 2025 मध्ये आमच्याकडे फक्त 23 वर्ष वेळ आहे भारतासारख्या खंडप्राय देशासाठी हा वेळ किती खूप कमी असलेला आहे. हे मला समजत आहे.

जागतिकीकरण , उदारीकरण व खाजगीकरण झाले त्यावेळी जे 40 ते 50 वयोगटातील पदवीधर लोक आता क्वचितच असतील परंतु त्यांची खूप मोठी स्वप्न या देशाबद्दल पाहिले असेल. त्यांना पण जागतिकीकरण , उदारीकरण व खाजगीकरण या शब्दाचा मोठेपणा वाटला असेल परंतु 2024-25 या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीच्या दुसऱ्या आठवड्यात अशा प्रकारे अचानक काही घटना कोणत्या प्रकारे घडल्या की अमेरिकेचा एक डॉलर बरोबर भारताची 86 रुपये ही घसरण भारताच्या नाणे बाजारात पाहायला मिळाली. त्यामुळे रुपयाची सद्यस्थिती घसरण व उपाय हा संशोधन प्रकल्प खूप महत्त्वाचा मला वाटतो. आपल्या भारत देशात मधील धोरणकर्ते ज्यावेळी म्हणतात की भारत जगातील तिसरी आकारमानाने व्यापक असलेल्या अर्थव्यवस्था आहे. भारताला तिसऱ्या क्रमांकाचे कोणत्या आधारावर बनवणार आहोत ते लक्षात घेणे गरजेचे दिसून येते. सध्याचे युग हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पोषक युग आहे.

ॲडम स्मिथ यांच्या मते "पूर्ण स्पर्धकात्मक भांडवलशाहीमुळे उत्पादन केलेल्या वस्तूची किंमत खाली राहिल आणि त्याचा दर्जा वाढेल त्यामुळे फक्त भांडवलदारांचा नव्हे तर सामान्य जनतेचा देखील फायदा होईल"असा विचार त्यांनी 1776 मध्ये मांडला. त्यामुळे त्यांना सनातनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून खूप मोठी ओळख मिळाली परंतु माझ्या मते त्यांच्या विचाराची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली असे मी गृहीत धरतो पण त्यामुळे मला ॲडम स्मिथ यांचा उल्लेख समाजवादी सनातनी अर्थशास्त्रज्ञ असा करावा लागेल. तर दुसरीकडे पॉल क्रुगमन यांनी विचार मांडला "1980 च्या दशकाची उत्पन्नात वाढ झाली त्यातील 30 टक्के ही सरप्लस वाढ 99 टक्के लोकांना मिळाली व 70 टक्के वाढ ही एक टक्के श्रीमंत लोकांना मिळाली. 1980 नंतर भारतात व जगात प्रचंड विषमता वाढली. आज भारत देशात आर्थिक विषमता गेल्या 75 वर्षांमध्ये शिखरावर असल्याचे आपणास दिसून येते. त्यामुळे भारतीय रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय या विषयाचा जाणीवपूर्वक अभ्यास करणे मला महत्त्वाचे आहे. अर्थव्यवस्थेचा विकास हा ट्रिकल डाऊन पद्धतीने व्हायला हवा परंतु तो ट्रिकल अप पद्धतीने का झाला याचे देखील प्रस्तुत शोधनिबंधात विवेचन करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे:**

कोणत्याही मानवी कार्यामध्ये काही ठराविक उद्दिष्टे आवश्यक असतात. सामाजिक संशोधनामध्ये तर ते कार्य यशस्वी होते असे मला वाटते. सामाजिक संशोधनांमध्ये तर उद्दिष्टे ही आवश्यक असतातच. यामधूनच सामाजिक संशोधनाचा पाया घातला जातो.

भारतीय रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय ज्या विषयांमध्ये तर आवश्यक आहे की सर्वप्रथम योग्य उद्दिष्टे ठरविणे. उद्दिष्टे ठरवल्यानंतर शोधनिबंधाचा चिकित्सात्मक अभ्यास करणे श्रेयस्कर ठरते त्यासाठी मी खालील उद्दिष्टे निश्चित केले.

१) भारतीय चलन रुपयाचा आढावा घेणे.

२)भारतीय रुपयाची सद्यस्थिती समजून घेणे.

३) भारतीय चलनाच्या घसरणीची कारणे शोधणे.

४) भारतीय चलनाची घसरण थांबावी म्हणून उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती:**

भारतीय रुपयाची घसरण सद्यस्थिती व उपाय यामध्ये संशोधन पद्धती ही दुय्यम साधन साम्रगी आधारित असून त्यासाठी मी विविध पुस्तके, विविध नियतकालिके, आंतरजालावरील माहिती ही सर्व मला गरजेची वाटते. या शोध निबंध साठी ही साधन सामग्री वापरले अपरिहार्य ठरते. भारतीय चलनाची घसरणे हे आपल्या देशाला खूप मारक असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आपल्या भारत देशाच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर खूप हानी होताना दिसून येते. वर्तमानपत्रांमध्ये आपल्याला चलनाची घसरण होत असल्याचे दिसून येत आहे. रोजच बातम्या येतात आणि जातात. चलनाची घसरण म्हणजे काय ते समजावून घेणे गरजेचे आहे. जगातील चलने परस्परांमध्ये विनिमयक्षम असतात म्हणजे एका चलनाचे अदलाबदल इतर चलनांमध्ये करता येते. मात्र विविध सरकारे चलनाच्या विनिमयावर आधारित नियंत्रणे टाकत असतात.

**व्याख्या** :

दिनांक 13 जानेवारी रोजी एक डॉलर भारतीय व्यक्तींना प्रवासासाठी घेण्यासाठी भारतीय चलनातील 86 रुपये जर द्यावी लागत असतील असे आपण गृहीत धरू व दिनांक 14 जानेवारी रोजी एक डॉलर घेण्यासाठी 87 रुपये लागत असतील तर रुपया 100 पैशांनी महागला किंवा14 जानेवारी 2025 रोजी एक डॉलर घेण्यासाठी जर 85 रुपये लागत असतील तर रुपया 100 पैशांनी घसरला असे आपण म्हणू शकतो.

**संख्यात्मक विवेचन:**

कोणतेही देशा संदर्भात पैसे हे खूप महत्त्वाची भूमिका बजावताना आपल्याला दिसून येते अर्थशास्त्राचा दृश्य नियम हा आहे की एका व्यक्तीचे उत्पन्न हा दुसऱ्या व्यक्तीचा खर्च असतो त्याप्रमाणेच आपण देखील एका राष्ट्राचा खर्च हा कोणत्याही दुसऱ्या राष्ट्राचे उत्पन्न असते. या शोधनिबंधासाठी मी 2012 ते 2024 या वर्षातील आकडेवारी विचारात घेतली आहे.

| वर्ष | आयात | निर्यात | तुट | भां. तुट | डॉलर दर |
|---|---|---|---|---|---|
| १२-१३ | २७३२१४६ | १६६७६९० | १०६४४५६ | २०७०२ | ५३.४४ |
| १३-१४ | २८१५९१८ | २९३१०७४ | ८८४८४५ | ९६०५४ | ५६.५७ |
| १४-१५ | २८२००७२ | १९३४२१० | ८८५८६२ | ३७७९२५ | ६२.३३ |
| १५-१६ | २५९२८२० | १७४३२८९ | ८४९५३१ | ११५८३० | ६२.९७ |
| १६-१७ | २६३३३९५ | १८७८९४३ | ७५४४५२ | १४४२३४ | ६६.४६ |
| १७-१८ | ३०२३१६३ | १९९१४३६ | १०३१७२७ | २८०८१६६ | ६७.७९ |
| १८-१९ | ३६१९०७२ | २३५८२११ | १२६०८६१ | +२०२०४ | ७०.०९ |
| १९-२० | ३३८५८२२ | २२७०९१९ | १११४९०९ | ४२३२०६ | ७०.३९ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०-२१ | २९४६३१८ | २१९३२५३ | ७५३०६५ | ६४९६८१ | ७६.३८ |
| २१-२२ | ४६१३०४९ | ३१९९११५ | १४१३९३४ | ३४९११९ | ७४.५७ |
| २२-२३ | ५७९१९२६ | ३६६१२८७ | २१३०६३९ | ७००४९ | ८१.८४ |
| २३-२४ | ५६५९९१६ | ३६५५४७१ | २००४४४५ | ५२६९३१ | ८५.५० |

• आकडे  कोटीत व डॉलर दर हा भारतीय रुपयामध्ये

वरील प्रमाणे आपण भारताची बारा वर्षाची भारताच्या इतर देशांवर असलेली आंतरराष्ट्रीय व्यापारी व वित्तीय भागीदारी स्पष्ट करू शकतो. त्याचप्रमाणे भारताची निर्यात दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. परंतु भारताच्या आयात वाढत चाललेली दिसून येते. याचा परिणाम भारताच्या दृश्य चालू खात्यावर तूट वाढत चाललेली आहे असे आपण स्पष्ट करू शकतो. एकंदरीतच दिवसेंदिवस भांडवली तूट देखील वाढत चाललेले आहेत. अमेरिका, जपान, कॅनडा, इंग्लंड या देशांमध्ये भांडवलदार हे आज पण आपल्या भारत देशाला कमी कालावधीत जास्त नफा देणारी अर्थव्यवस्था म्हणून बघतात. त्यामुळे 13 जानेवारी 2025 रोजी आपल्या देशात ब्लॅक मंडे ची परिस्थिती तयार झाली होती. आपली अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था जरी असली तरी पण 1980 नंतर गरीब श्रीमंत दरी व वाढत चाललेली दिसून येते. 2024 मध्ये बेरोजगारीचा दर दहा टक्के होता. आपण जर डॉलर आणि रुपयाचे तुलना गेल्या दहा वर्षांमध्ये केली तर घसरण खूप वेगाने दिसून येते.अशा प्रकारे व्यापार तूट भांडवल खात्यावरील तुट आणि डॉलरची वाढती महागाई दिसून येते.

**निष्कर्ष:**

1) 2012 - 13 या आर्थिक वर्षां मधून व्यापारी तुट व भांडवल तुट वाढत चाललेली दिसून येते.
2) विदेशी गुंतवणूक अचानकपणे जेव्हा कमी होते त्यावेळेस रुपया खूप घसरत असल्याचे आपणास दिसते.
3) आयात खूप वाढत चाललेली आहे.
4) भांडवली वस्तूचे आयात खूप वाढत चाललेली आहे.

**उपाययोजना:**

संशोधनकर्त्याचे कर्तव्यच असते की आपण केलेल्या संशोधन समस्येचे चिकित्सनात्मक अध्ययन करून उपाय योजना सुचवणे. त्यामधून समाजाचे महत्तम हित साधले जावे. त्यासाठी मला काही उपाय योजना सुचवाव्या लागतील.

हेक्चर -ओलीन यांच्या मते श्रमप्रधान देशाने श्रमप्रधानवस्तूचे उत्पादन करावे व त्याची निर्यात करावी व भांडवल प्रधान देशाने भांडवल प्रधान वास्तूची निर्यात करावी व  श्रम प्रधान वस्तूचे आयात करावी. या सिद्धांताचा वापर सध्या अमेरिकेची संयुक्त संस्थांनी ( युएसए )करत असलेले आपणास दिसून येते. परंतु भारतासारख्या विकसनशील देशांना 2047 मध्ये विकसित भारताचे ध्येय ठेवलेल्या राष्ट्रांना या सिद्धांतानुसार  व्यापार करणे आर्थिक दिवाळ खोलीचे आहे लक्षण आहे असे माझे मत आहे.

आज भारतामध्ये ज्या वस्तूंना यंत्राचा वापर करून  निर्मिती केली जाते त्या वस्तूंची आपली आयात प्रचंड वाढलेली आहे.  याचा अर्थ आपली लोकसंख्या वाढली म्हणून आपली आयात वाढली असे विधान करणे मूर्खपणाच्या आहे. वास्तविक परिस्थिती अशी आहे की आपण औद्योगीकरण विकेंद्रीत स्वरूपात  पोहोचवण्यात अपयशी झालो आहोत. उद्योगांचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. मुंबई,

पुणे, चिंचवड, पिंपरी, गुरुग्राम, या ठिकाणी उद्योग केंद्रिकरण होणे भारतासाठी फायद्याचे नाही.

पंडित नेहरूजींचे सहकार मॉडेल यामध्ये पंडित नेहरू हे ग्रामीण भागातील सहकार क्षेत्राचा विकास करताना आपणास दिसून येतात. गांधी, आंबेडकर, नेहरू यांचे औद्योगीकरण संदर्भात विकेंद्रित त्याच बरोबर कृती जरी असली तरी पण या या सर्व उद्योगांना कच्चामाल म्हणून शेतमालाची आवश्यकता असते. जसे की यातून सूत बनवण्यासाठी कापूस, साखर कारखान्यातून साखर बनवण्यासाठी ऊस. हे उद्योग प्राथमिक क्षेत्राशी निगडित आहे.

अमेरिकेची संयुक्त संस्थाने, ग्रेट ब्रिटन, जपान, युरोपियन युनियन, पर्यावरणाचा ऱ्हास करून विसाव्या शतकात विकसित झाले. आज अमेरिकेची डेल कंपनी संगणक क्षेत्रात व ॲमेझॉन कंपनीही सेवा क्षेत्रात ग्रेट ब्रिटन या देशांनी ब्रिटिश युनिलिव्हर लिमिटेड, जपान या देशाची सोनी कंपनी, युरोपियन युनियन ची पशुसंवर्धनामध्ये काम करणारी डलवाल कंपनी हे उद्योग समूह जगावर राज्य गाजवत आहे. भारत पण गरीब देश नाही. ग्रेट ब्रिटनमध्ये सर्वात जास्त अकुशल कामगारांना रोजगार हा टाटा उद्योग समूह पुरवितो. परंतु जगातील 25 प्रमुख उद्योग संस्थांमध्ये पाचपेक्षा जास्त उद्योग संस्था अस्तित्वात नाही.

भारत सरकारने खालील उपयोजना कराव्यात.

1. आपली व्यापारी तूट कमी होईल व भांडवली यांनी देणे कमी होईल.
2. उद्योगांचे विकेंद्रीकरण करणे.
3. शेतीमधून चांगल्या प्रकारचा कच्चा माल तयार होण्यासाठी भारत सरकारने शेतकऱ्यांना पायाभूत सुविधा पुरव्यात.
4. निर्यात सुलभ होण्यासाठी प्रयत्न करावे.
5. भारतीय शेतकऱ्यांना आंतरराष्ट्रीय मानांकानुसार पिके उत्पादित करण्यासाठी मार्गदर्शन करावे.

**सारांश:**

भारत हा जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. जीडीपी $ ३.८९ ट्रिलीयन डॉलर आहे. लिविंग प्लॅनेट अहवालामध्ये दिवसेंदिवस हानी होत चाललेले आपणास दिसते. हॉलिवूडच्या जंगलाला यूएसए मध्ये लागलेला वनवा खूप काही सांगून जातो. एकविसाव्या शतकात मानवाने पर्यावरणाची सर्वात जास्त हानी केलेले आहे.

**संदर्भ:**

१) कोळंबे रंजन, भारतीय अर्थव्यवस्था(२०२१) भगीरथ प्रकाशन, पुणे
२) भारतीय अर्थव्यवस्था प्रतियोगिता दर्पण २०२३
३) डॉ आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे, (२०२०) श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
४) गोडबोले अच्युत, अर्थात (२०२२) मधुश्री प्रकाशन, पुणे
५) डॉ विलास आढाव , चिरेबंदी कृषी बाजार आणि दुर्बल शेतकरी(२०२०) सुगावा प्रकाशन, पुणे
वेबसाईट
https://m.rbi.org.in//home.aspx